# देगलूर महाविद्यालयात भित्तीपत्रकाचे प्रकाशन



**देगलूर / प्रतिनिधी**

अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्राच्या वतीने प्रासंगिक स्वरूपाने 'प्रशासनामा' हे भित्तिपत्रक प्रकाशित केले जाते. विद्यार्थ्यांमध्ये लेखनाची व विचार मंथनाचा स्तर विकसित व्हावा या उद्देशाने भितीपत्रक चालविले जाते. इ. स. १९६३ च्या देगलूर महाविद्यालयाच्या पहिल्या तुकडीचे विद्यार्थी तथा देगलूर महाविद्यालयातील पहिले विभागप्रमुख ज्येष्ठ प्रा. रामराव थडके यांच्या हस्ते ' प्रशासननामा' या भितीपत्रकाचे दि. ०१ नोव्हेंबर बुधवार रोजी प्रकाशन करण्यात आले.

यावप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ , उपप्राचार्य डॉक्टर अनिल चिद्रावार , लोकप्रशासन विभाग प्रमुख डॉ. बी. आर. कत्तुरवार , डॉ. संजय देबडे . प्रा. ज्ञानेश्वर कोकणे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner